अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्प औषधी, सुगंधी वनस्पती व पानवेली (भा.कृ.सं.प.)
नागार्जून वनौषधी उद्यान, डॉ. पंदेकृवि, कृषिनगर, अकोला, ४४४ १०४ (महाराष्ट्र)
e mail - nmpgpdkv@gmail.com

जा.क्र.प्र.ना.व.उ/रो.वा./ ०४ /२०२५ दि. ०४/०४/२०२५

# निविदा सूचना

विषय :- सन २०२५-२६ करिता नागार्जुन वनौषधी उद्यान डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला येथील वनौषधी रोपवाटीकेमध्ये व प्रक्षेत्रावरील विविध कामे कंत्राटी पध्दतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर मागविणेबाबत.

संदर्भ :- मा. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचे परिपत्रक जा.क्र. बिईए/ आस्था/ कंत्राट/ कर्म/ २०२१/५९४ दिनांक. २२/०६/२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नागार्जुन वनौषधी उदयान डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला येथे सन २०२५-२६ करिता वनौषधी रोपवाटीकेमध्ये, प्रक्षेत्रावरील संशोधनात्मक प्रयोगामध्ये व दैनंदिन विविध कामाकरिता स्त्री/पुरुष कंत्राटी मजूर खाजगी तत्वावर लावण्याकरिता बंद लिफाफ्या मध्ये खालील पत्त्यावर दिनांक २१/०४/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठविण्याबाबत वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून कंत्राटी मजुराचे दर मागविण्यात येत आहे.
करिता खाली दिलेल्या निविदामध्ये फक्त सेवा कर नमूद करून एकूण निविदा दर सादर करावे.

| अ. क्र. | विवरण | अकुशल मजूर/चौकीदार | | कुशल मजूर/चौकीदार | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन प्रती मजूर वेतन रू. | प्रति महिना प्रती मजूर वेतन रू. | प्रति दिन प्रती मजूर वेतन रू. | प्रति महिना प्रती मजूर वेतन रू. (३० दिवसांसाठी) | |
| १ | संस्थात्मक शेतीकरीता किमान वेतन | १८०/— | ५४००/— | २४०/— | ७२००/— | |
| २ | सुधारीत विशेष भत्ता | १४१.९६/— | ४२५९/— | १४१.९६/— | ४२५९/— | |
| एकूण किमान वेतन (किमान वेतन नियमाप्रमाणे) | | ३२१.९६/— | ९६५९/— | ३८१.९६/— | ११४५८.८/— | |
| ३ | राज्य कामगार विमा (रा.का.वि.म. नियमाप्रमाणे) कामगाराचे योगदान (३.२५ टक्के) | १०.४६/— | ३१३.९१/— | १२.४१/— | ३७२.३/— | |
| ४ | कामगार भविष्य निर्वाह निधी कामगाराचे योगदान १३ टक्के | ४१.८५/— | १२५५.६४/— | ४९.६५/— | १४८९.६४/— | |
| | एकूण रक्कम | ३७४.२७/— | ११२२८.५५/— | ४४४.०२/— | १३३२०.७४/— | |
| ५ | सेवाकर रू. | | | | | |
| | एकूण रक्कम | | | | | |

नोट :—

१. उपरोक्त नमूद दर हे किमान वेतन कायदयानूसार तसेच वरीष्ठ कार्यालयांनी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रकानूसार असून या पेक्षा कमी दर ग्राहय धरण्यात येणार नाही. कंत्राटदारास लागू असल्यास इतर बाबी योग्य स्पष्टीकरण व कागदपत्रासह नमूद करू शकता.

२. प्रतिमहिना २६ दिवस व त्यापेक्षा जास्त दिवस मजूर हजर असल्यास सुधारीत विशेष भत्ता पूर्ण महिन्याचा देण्यात येईल.

नियम व अटी :-

१. निविदा पत्रक कार्यालयीन वेळेत दि. २१/०४/२०२५ पर्यंत स्वीकारल्या जातील.

२. निविदा प्रमुख, नागार्जुन वनौषधी उद्यान डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला यांचे नावे देण्यात यावे.

३. कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर लावण्याची संपूर्ण जवाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.

४. कंत्राटी मजुराचे वय १८ वर्षा पेक्षा कमी व ६० वर्षा पेक्षा जास्त असू नये.

५. आपण पुरवठा केलेल्या मजुराने अनुचित प्रकार केल्यास त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. कंत्राटी मजुरांची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

६. काही विपरीत घटना तथा विपरीत बाबी / प्रसंगी कंत्राट आपोआप संपूष्ठात येईल.

७ पुरवठाधारकाचे मजूर पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असतील त्यात विद्यापीठ प्रशासनाचा कोणताही संबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही. मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्ठता यादी विभागामार्फत देण्यात येणार नाही.

८ विभागावर देण्यात आलेली कामे पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

९ कंत्राटदारास कामाच्या आवश्यकतेनुसार मजूर उपलब्ध करून द्यावे लागतील.

१० मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकाने देयक सादर करतेवेळी बँक खाते क्रमांक बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करतेवेळी देण्यात यावी.

११ कंत्राटदारास कामे देतांना कंत्राटदारानांनी देय रकमेच्या १०% रक्कम अनामत रक्कम म्हणून प्रभारी अधिकाऱ्याकडे जमा करावी व १०० रु. च्या बॉड पेपरवर उपरोक्त कामे व्यवस्थित होण्यासाठी घालण्यात आलेल्या अटी/शर्ती मान्य असल्यास लिहून द्यावे लागेल.

१२ कंत्राटदारास संबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारीत करण्यात येईल.

१३ प्रक्षेत्रावरील विभागावर कामे तसेच बिजोत्पादानाचे कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्रि/पुरुष मजुरांना कामगार (लेबर कायदा) कायद्यानुसार किमान वेतन/ विमासंरक्षण/ भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पध्दतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे कराचा नियमाने व नियमित भरणा करणे इ. संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. संबंधित नियमित भरणा केल्याची पावती या कार्यालयास पुढील प्रत्येक देयकापुर्वी सादर करणे आवश्यक राहील.

१४ प्रक्षेत्रावरील कामे ही १२ महिन्यातील खरीप, रबी व उन्हाळी या तीनही हंगामाकरिता असून कामाचे दर ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध राहतील. तसेच विद्यापीठात काम केले म्हणून स्थायी बाबतचा दावा करता येणार नाही.

प्रमुख,
नागार्जुन वनौषधी उद्यान
डॉ. पं दे कृ वि, अकोला

प्रतिलिपी:

प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला यांच्याकडे निविदा सूचना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यास्तव सादर.